# औषध घेताना घ्या काळजी!

औषध घेण्याच्या काही विशिष्ट पद्धती असतात. जर त्या पाळल्या नाही गेल्या तर समस्या आणखी वाढू शकतात.

▮जर तुम्ही नियमित आपल्या फॅमिली डॉक्टरकडे जात असाल आणि एखाद्या नवीन डॉक्टरकडे गेल्यास तुमची मेडिकल हिस्ट्री आणि सध्या घेत असलेल्या औषधांची माहिती त्या डॉक्टरांना अवश्य द्या. कोणत्या औषधानं ॲलर्जी होत असल्यास त्याचीही माहिती डॉक्टरांना द्या.

▮आपल्या मर्जीनं जुन्या प्रिस्क्रिप्शनवर औषधं घेऊ नये. कारण ती औषधं त्यावेळची लक्षणं आणि आजार पाहून दिलेली असतात.

▮एखादं औषध घेतल्यावर पोट खराब होणं, स्किन इन्फेक्शन अथवा सूज आल्यास तत्काळ डॉक्टारांशी संपर्क साधा.

▮औषध रिकाम्यापोटी खायचं आहे की जेवण झाल्यानंतर खायचंय याची माहिती डॉक्टरांना विचारावी.

▮औषधाची एक्सपायरी डेट पाहावी. तारीख बरोबर असेल मात्र औषधाची अवस्था खराब असल्यास, सिल फोडलेलं असल्यास अथवा रंग खराब झालेला असल्यास ते औषध घेऊ नये.



# लाकडी कंगव्याचा वापर देईल केसांना नवसंजीवनी

आजकाल केस गळणे, तुटणे, रुक्ष होणे अशा अनेक तक्रारी ऐकायला येतात. त्यावर उपचार म्हणून विविध प्रकारचे शाम्पू, तेल, कंडिशनर वापरण्याचा सल्ला दिला जातो, मात्र तरीही खूप फायदा होतो असे दिसून येत नाही. त्यामुळे आपल्या या केस समस्येचे कारण आपण वापरत असलेला कंगवा तर नाही ना याची खात्री करून घ्यायला हवी. कारण केसांच्या या तक्रारींसाठी तुम्ही वापरात असलेले प्लास्टिक अथवा धातूचे कंगवे कारणीभूत असू शकतात. या समस्येतून सुटका करून घेण्यासाठी लाकडापासून बनवले गेलेले कंगवे खूपच उपयुक्त ठरतात.



**भारतात** फार पूर्वीपासून लाकडापासून बनवलेली फणी वापरण्याची प्रथा होती. आजही ग्रामीण भागात वृद्ध आजीबाईकडे अशी फणी सापडू शकेल. मात्र काळाच्या ओघात ही प्रथा बंद पडली. आता या फण्या कदाचित जुन्या वस्तुसंग्रहालयात पाहायला मिळतील. पण बाजारात अनेक कंपन्यांनी विविध झाडांच्या लाकडापासून बनवलेले कंगवे आणले आहेत. हे कंगवे तुमच्या केसांना नवसंजीवनी देणारे ठरू शकतात. याची अनेक कारणे आहेत.

डोक्याची केसाखालची त्वचा लाकडी कंगव्याच्या वापराने दाबली जाते. याचा फायदा डोक्यावरील ॲक्युप्रेशर पॉइंटना होतो आणि त्वचेला मसाज मिळाल्याने तेथील रक्तप्रवाह सुधारतो. परिणामी केसाची मुळे घट्ट बनून केसगळती कमी होते. प्लास्टिक वा धातूचा कंगवा वापरून डोक्याच्या त्वचेत जे नैसर्गिक तेल असते ते समप्रमाणात पसरत नाही परिणामी केस तुटतात मात्र लाकडी कंगव्याने हे तेल एकसारखे डोक्यावर पसरले जाते त्यामुळे केस अधिक हेल्दी आणि चमकदार बनतात. अनेकांची डोक्याची त्वचा मुळातच तेलकट असते. लाकडी कंगवा हे तेल सर्वत्र पसरवतो आणि केस कमी तेलकट दिसतात.

लाकडी कंगव्याचे दात टोकदार नसतात तर थोडे बोथट असतात. त्यामुळे हा कंगवा केसातील गुंता सहज काढतो आणि केसात घर्षण कमी झाल्याने केस तुटण्याचे प्रमाण कमी होते. केसाखालची त्वचा सेन्सिटिव्ह असेल तर धातू अथवा प्लास्टिक कंगव्याने ॲलर्जी येऊ शकते तो धोका लाकडी कंगव्यामुळे राहत नाही कारण लाकूड हे नैसर्गिक आहे.



# प्रेग्नेन्सीदरम्यान ताण ठेवा दूर

जर आपण गरोदर असाल, तर जितकं शक्य असेल तितकं ताण-तणावापासून दूर राहा. कारण एका अभ्यासात पुढे आलंय की, गरोदर महिलेच्या ताणामुळं संबंधित हार्मोन्सचा भ्रूणाच्या विकासावर परिणाम वाईट होतो.

**तणावा** संबंधीच्या हार्मोन्सचा उंदरांच्या पिल्लांवर काही परिणाम होतो का? याचा शोध घेण्यासाठी गर्भवती उंदराला ग्लूकोकॉर्टिकॉइड कॉर्टिकोस्टेरॉन हॉर्मोन दिलं गेलं. त्यानंतर संशोधकांना आढळलं की, या हार्मोनमुळे त्यांची भूक खूप वाढली. मात्र त्यांचा प्लासेंटातून भ्रूणाला मिळणाऱ्या ग्लूकोजची मात्रा कमी झाली. संशोधनाचे मुख्य लेखक ओवन वाउगन म्हणाले, निष्कर्षातून ही बाब समोर आली की, आईच्या शरीरात असलेलं तणाव हार्मोन ग्लूकोकॉर्टिकॉइड भ्रूणाच्या पोषणाला नियंत्रित करतं. आईच्या शरीरात या हार्मोनची मात्रा जितकी जास्त असेल तितका परिणाम भ्रूणाच्या विकासावर होईल. गर्भाचं वजन कमी होऊ शकतं. हा अभ्यास प्रबंध 'द जर्नल ऑफ फिजिओलॉजी' या मासिकात प्रकाशित झालाय.

# सब्जा खाण्याचे गुणकारी फायदे

तुळस भारतीय घरांतील पूजनीय झाड आहे. अनेक घरांमध्ये तुळशीचं रोपटं लावलेलं पाहायला मिळतं. तुळस अनेक आजारांवर औषधी म्हणून काम करते. तुळशीचं बी म्हणजेच सब्जा शरीरासाठी अतिशय गुणकारी आहे. उन्हाळ्याच्या दिवसात सब्जाचं सेवन केल्याने शरीरात होत असलेला दाह कमी करण्यास मदत होते. सब्जा आपल्या शारीरिक विकासासोबतच मानसिक विकासासाठीही लाभदायक ठरतो. सब्जामध्ये कॅलरीज, प्रोटिन, कार्बोहायड्रेट, विटॅमिन ए, के, ई, बी, मॅग्नेशियम, फायबर, कॅल्शियम आणि



**वजन कमी करते**

सब्जा वजन कमी करण्यासाठी अतिशय फायदेशीर आहे. सब्जामध्ये अल्फा-लिनोलेनिक ॲसिड असतं. यामुळे शरीरातील पचनक्रिया सुधारण्यास मदत होते. त्यामुळे वजन कमी होण्यास मदत होते. सब्जामध्ये फायबर मोठ्या प्रमाणात असतं त्यामुळे भूक नियंत्रणात ठेवण्यास मदत होते.

**बद्धकोष्ठतेचा त्रास**

बद्धकोष्ठतेचा त्रास असल्यास सब्जा गुणकारी ठरतो. सब्जा शरीरातील डिटॉक्सिफिकेशनच्या प्रक्रियेत मदत करते आणि पोट, पचन क्रिया सुरळीत करून आतड्यांचे कार्य चांगले ठेवते. गरम पाण्यात सब्जा भिजवून रोज रात्री दुधासोबत घेतल्याने फायदा होतो. सब्जामुळे गॅससंबंधी समस्या दूर होण्यास मदत होते. पोटातील जळजळ, ॲसिडिटी कमी करण्यासही मदत होते.

**त्वचा**

प्रदूषणामुळे त्वचेवर मोठा परिणाम होत असतो. परंतु सब्जा त्वचेला ठीक करण्यासाठी फायदेशीर ठरतो. नारळाच्या तेलात सब्जा भिजवून त्याने त्वचेवर मसाज करा. त्यामुळे त्वचा तजेलदार होण्यास मदत होते.

**केसांसाठी फायदेशीर**

प्रदूषणामुळे केस निर्जीव होतात. सब्जात असणारी विटॅमिन, लोह, प्रोटीन अशी पोषक द्रव्ये केसांसाठी उपयोगी ठरतात. तेलात सब्जा भिजवून लावल्याने केस चमकदार होण्यास मदत होते.

**या आजारांवर गुणकारी**

मानसिक समस्या म्हणजेच टेन्शन, डिप्रेशन, मायग्रेन यांसारख्या आजारांवर सब्जा फायदेशीर ठरतो. सब्जाच्या सेवनाने उत्साही वाटते. उन्हाळ्याच्या दिवसांत पोट थंड राहते. सब्जाच्या सेवन केल्याने खाल्ल्यानंतर पोटात ॲसिडिसी कमी होते. रोगप्रतिकारशक्ती वाढते. सब्जामुळे शरीरातील टॉक्सिन दूर होतात. त्यामुळे अनेक छोट्या-छोट्या समस्या कमी होतात. शरीराला एनर्जीही मिळते.

# ब्युटी प्रॉडक्ट्सपेक्षा हेल्दी डायट आवश्यक

उन्हाळ्यात घरातून बाहेर निघण्यापूर्वी सनस्क्रीन लावण्याचा सल्ला दिला जातो. उन्हात नाजूक त्वचेवर जळजळ होते आणि लाल डागदेखील पडू शकतात. अशात आज आम्ही आपल्याला असे काही उपाय सांगत आहोत ज्यामुळे त्वचेचं आरोग्य चांगले राहील आणि सौंदर्यप्रसाधने प्रॉडक्ट्सवर निर्भरता कमी. त्वचेच्या आरोग्यासाठी ब्युटी प्रॉडक्ट्सपेक्षा हेल्दी डायट अधिक आवश्यक आहे. त्वचेचं तारुण्य टिकून राहावं म्हणून प्रोटीन आणि व्हिटॅमिन सी अत्यंत आवश्यक आहे. याने त्वचेवर एक सुरक्षा परत तयार होते.

योग्य आहार

बीन्समध्ये जिंक आणि हायड्रोलिक ॲसिड आढळत ज्याने त्वचेत कोलाजन पातळी राखण्यास मदत मिळते.

*गाजरामध्ये व्हिटॅमिन्स ए भरपूर प्रमाणात आढळतं. याचे सेवन केल्याने पिंपल्स, पुरळ यासारख्या समस्या दूर होण्यास मदत मिळते. सोबतच त्वचेत रक्त संचार योग्यरीत्या होतं.



* शाईनी स्कीनसाठी आहारात ओमेगा-३ फॅटी ॲसिड सामील करावे. मासे सेवन करणे त्वचा आणि केस दोघांसाठी फायदेशीर ठरतं.

* ब्लूबेरीमध्ये अधिक प्रमाणात ॲंटीऑक्सिडेंट्स आढळतं. ब्लूबेरीजचे सेवन केल्याने त्वचा खूप काळ सॉफ्ट राहते. याने हृदयासंबंधी तसेच कर्करोग यासारखे आजारदेखील टाळता येऊ शकतात.

*उन्हाळ्यात आपल्या आहारात लाल सिमला मिरच्या, टोमॅटो आणि स्ट्रॉबेरीज सामील करा. याने त्वचेचं आरोग्य राखण्यास मदत मिळते.

# उन्हाळ्यात शिळं अन्न खाण्याचे ५ मोठे तोटे

**बिझी** शेड्यूल असल्यामुळे अनेक लोक एकत्र अन्न शिजवून वेळोवेळी फ्रीजमधून काढून वापरत असतात. तसे तर असे करणे योग्य नाही, तरी उन्हाळ्यात याबद्दल विशेष काळजी घेण्याची गरज असते. शिळ्या पदार्थांमध्ये बॅक्टेरिया वाढू लागतात आणि यामुळे आरोग्यावर वाईट परिणाम दिसून येतात. किती वेळ पूर्वी तयार जेवण करणे योग्य ठरेल, असा प्रश्न आपल्या मनात असेल तर डॉक्टरांप्रमाणे चार ते पाच तास पूर्वी तयार अन्न खायला हरकत नाही, परंतु याहून अधिक वेळेपूर्वी तयार पदार्थ खाणे आपल्या आरोग्यासाठी योग्य ठरणार नाही. कापलेले फळ आणि भाज्या तर मुळीचं वापरू नये. याचे नुकसान जाणून घ्याः

**कर्करोगाचा धोका**

शिळं अन्न पोटातील कर्करोगाचा धोका निर्माण करतं. यातून आढळणारे बॅक्टेरियामुळे हायड्रोकार्बन आणि कॅन्सरचा धोका वाढतो.

**ताप येणे**

बॅक्टेरिअल इन्फेक्शनमुळे ताप येण्याची शक्यता नाकारता येत नाही.

**पोटदुखी**

शिळं अन्न खाल्ल्याने पोटात गॅस, ॲसिडिटी आणि पोटदुखी सारख्या समस्या झेलाव्या लागू शकतात.



फ्रीजमध्ये गार झालेले अन्न खाल्ल्याने देखील पोटदुखीची तक्रार होते.

**फूड पॉइजनिंग**

उन्हाळ्यात तापमान अधिक असल्यामुळे खाद्यपदार्थांमध्ये बॅक्टेरिया लवकर पसरू लागतात. एक ते दोन तासांतच कीटाणूंची संख्या तिप्पट वाढते ज्यामुळे फूड पॉइजनिंग आणि लूज मोशनसारख्या समस्या उद्भवतात.

**अतिसार**

पचनतंत्र आणि प्रतिरक्षातंत्र कमजोर झाल्यामुळे उन्हाळ्यात शिळं अन्न सेवन केल्याने अतिसारचा धोका उद्भवू शकतो. यामुळे लूज मोशन, उलट्या, ताप देखील होऊ शकतो. अनेकदा शरीरात पाण्याच्या कमीमुळे धोका निर्माण होतो. फ्रीजमध्ये ठेवलेले डेअरी प्रॉडक्ट्स देखील अधिक दिवसापर्यंत वापरू नये. दूध उकळल्यावर ते त्याच दिवशी संपवावे.

# हिडिम्बा माता

हिमाचल प्रदेश हा भारतीयांसोबत परदेशी पर्यटकांना भुरळ घालतो. हिमाचल प्रदेशातील हिल स्टेशन हे पर्यटकांना आकर्षित करत असतात. हिमाचल प्रदेश म्हटलं की आपल्या डोळ्यासमोर पहिलं येतं ते मनाली. नयनरम्य अशा डोंगऱ्यात वसलेलं या शहराचा उल्लेख महाभारतात देखील झाला आहे. मनालीमध्ये असलेलं पुरातन मंदिर आहे ज्याचा उल्लेख महाभारताशी जोडलेलं आहे. हिडिम्बा मंदिर हे ढुंहरी शहरात असल्याने याला ढुंगरी मंदिर या नावाने देखील ओळखलं जातं. या मंदिराचा इतिहास हा महाभारताशी जोडलेला आहे. असं म्हणतात मनाली शहरातून भीम आणि पांडव कुठे तरी जात होते. त्यावेळी त्यांनी या जागेची जबाबदारी भीम यांची पत्नी हिडिम्बेला दिली. त्यानंतर हिडिम्बाला पुत्रप्राप्ती झाली. मग तिने या जागेची जबाबदारी पुत्राला दिली आणि हिडिम्बा तपस्यासाठी जंगलात निघून गेली. म्हणून तिच्या स्मृतीमध्ये या मंदिराची निमीर्ती करण्यात आली. राजा बहादुर सिंह यांनी या मंदिराची निमीर्ती केलं असं म्हटलं जातं. भीम आणि हिडिम्बाचं लग्न

पौराणिक कथेत म्हटलं जातं की, हिडिम्बा आपल्या भावासोबत या जागेवर राहत होती.





हिडिम्बाला आपल्या भावाच्या शौर्यावर खूप गर्व होता. असं म्हणतात हिडिम्बाने म्हटलं होतं की, माज्या भावाला युद्धा जो हरवेल मी त्याचाशी लग्न करेल. पौराणिक कथेनुसार भीम आणि पांडव इथे विश्रातीसाठी काही काळासाठी थांबले होते. त्यावेळी भीम आणि हिडिम्बाच्या भावामध्ये युद्ध झाले आणि या युद्धात हिडिम्बाच्या भावाचा पराभव झाला. या युद्धानंतर भीम आणि हिडिम्बाचं लग्न होतं.

हिडिम्बा मंदिराचं वैशिष्ट्यं

– हे मंदिर लाकड्याने बनवलं असून पॅगोडा शैलीत बांधले गेले आहे. तर या मंदिराच्या भिंती या दगडाने बनवल्या आहेत.

– या मंदिराच्या भिंतीवर असलेली सुंदर अशी शिल्पकला पर्यटकांचं लक्ष वेधून घेते.

– मंदिराचं प्रवेशद्वार हे लाकडाचं असून त्यावर हाताने प्राण्याचं चित्र रेखाटलं आहे.

– हे मंदिर घनदाट झाड्यांचा मध्ये उभ असल्याने या मंदिराची अजून शोभा वाढवतं.

मनालीच्या हिडिंबा देवी मंदिराची विचित्र कहाणी

हिडिंबा देवी हे महाभारतातील एक अपरिचित पात्र आहे. ती एक खंबीर आणि एकनिष्ठ स्त्रीचे उदाहरण आहे. आज, तिचे मंदिर मनालीमधील सर्वात लोकप्रिय पर्यटन आकर्षणांपैकी एक बनले आहे. मनालीतील हिडिंबा देवी मंदिर हिडिंबा राक्षसाला समर्पित आहे हिडिंबा देवीची कथा आपल्याला महाभारताच्या काळात घेऊन जाते . राक्षसी किंवा राक्षसी म्हणून जन्मलेली हिडिंबा हिडिंबची बहीण होती, काम्यका जंगलातील शक्तिशाली राक्षस राजा. दुर्योधनाच्या हत्येच्या प्रयत्नातून पांडव सुटल्यानंतर, पाच भाऊ थेट काम्यका जंगलात गेले, जे राक्षस भावंडांचे घर होते. पांडव जंगलात राहत असल्याचे कळल्यावर हिडिंबने आपल्या बहिणीला भावांना मारण्याचा आदेश दिला. पांडव बंधूंना भुरळ घालण्यासाठी हिडिंबाने स्वतःचे रूपांतर एका सुंदर स्त्रीमध्ये केले. पण पुढे जे घडले ते हिडिंबाला कधीच अपेक्षित नव्हते. ती पहिल्या नजरेतच सुबक, देखणा भीमाच्या प्रेमात पडली. तिच्या भावाची योजना पूर्ण करण्याऐवजी ती लग्नाचा प्रस्ताव घेऊन भीमाकडे गेली. हिडिंबा ही भीमाशी इतकी घट्ट झाली होती की तिने तिची खरी ओळख सांगितली आणि अत्यंत प्रामाणिकपणे हिडिंबपासून येणाऱ्या धोक्याबद्दल त्याला सावध केले. तिने, खरं तर, एका युद्धात तिचा भाऊ हिडिंबचा पराभव करण्यासाठी पांडवांना मदत केली. कुंतीच्या संमतीने भीमाने हिडिंबाशी विवाह केला. तथापि, भीमाची एक अट होती – एकदा तिने आपल्या मुलाला जन्म दिला की तो हिडिंबा सोडून जाईल. प्रेमाने ग्रासलेल्या हिडिंबाने ते सहज मान्य केले. एका वर्षाच्या आत या जोडप्याला एक मुलगा झाला आणि मान्य केल्याप्रमाणे भीम आणि इतर पांडव बंधूंना प्रदेश सोडावा लागला. हिडिंबाला जंगलात स्वतःचा आणि मुलाचा सांभाळ करण्यासाठी सोडण्यात आले. एकटी आणि वंचित असली तरी तिला भीमाबद्दल कोणतीही तक्रार नव्हती आणि तिने एकट्याने आपल्या मुलाला वाढवले, जो त्याच्या वडिलांसारखा बलवान योद्धा बनला. असे मानले जाते की तिच्या आयुष्याच्या उत्तरार्धात हिडिंबा कठोर तपस्या करत असे आणि शेवटी तिला अलौकिक शक्तींचा आशीर्वाद मिळाला. ती 'देवी' किंवा देवी बनली आणि त्या प्रदेशाची संरक्षक बनली. हिडिंबाला इतर असुरांपेक्षा वेगळे बनवणारा तिचा मानवी स्वभाव होता. ती तिचा भाऊ हिडिंबसारखी वाईट शक्ती नव्हती; ती दयाळू आणि उपयुक्त होती. तिच्याकडे पाहणाऱ्या स्थानिकांनी तिच्या नावाने मंदिर बांधले. आज हिडिंबा देवीची देवता म्हणून पूजा केली जाते आणि तिचे मंदिर मनालीमधील सर्वात लोकप्रिय पर्यटन आकर्षणांपैकी एक बनले आहे.

## दै. लोकरक्षणाय सुडोकू - ३३

| | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| 9 | 3 | 5 | | | 7 | | 4 | 2 |
| | 4 | | 1 | | 5 | | | |
| | | 7 | 2 | 3 | | 6 | | |
| | 8 | 2 | | 4 | | | 7 | 5 |
| | 5 | | | 1 | | | | 4 |
| | | | 9 | | | 3 | | |
| | 6 | | 5 | | | 7 | 8 | |
| | | 3 | 8 | 7 | | | | |
| | | 8 | | | 3 | | 9 | |

## उत्तर सुडोकू -३२

| | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| 3 | 9 | 5 | 4 | 8 | 6 | 1 | 2 | 7 |
| 6 | 7 | 8 | 9 | 1 | 2 | 3 | 4 | 5 |
| 2 | 1 | 4 | 3 | 5 | 7 | 6 | 8 | 9 |
| 7 | 2 | 1 | 6 | 3 | 5 | 8 | 9 | 4 |
| 5 | 6 | 9 | 7 | 4 | 8 | 2 | 1 | 3 |
| 8 | 4 | 3 | 1 | 2 | 9 | 5 | 7 | 6 |
| 4 | 8 | 6 | 2 | 9 | 3 | 7 | 5 | 1 |
| 9 | 3 | 2 | 5 | 7 | 1 | 4 | 6 | 8 |
| 1 | 5 | 7 | 8 | 6 | 4 | 9 | 3 | 2 |

एक ते नऊ आकडे आडव्या व उभ्या सरळ रेषेत अशा प्रकारे भरायचे की एका रेषेत एक आकडा एकदाच आला पाहिजे. प्रत्येक सरळ रेषेत आणि ३ बाय ३ च्या प्रत्येक लहान चौकात सर्व एक ते नऊ आकडे आलेच पाहिजेत. आधीच्या छापील आकड्यांची अजिबात हलवाहलव करायची नाही. प्रत्येक कोड्याला एकच उत्तर आहे.

## दिनविशेष

१६ मार्च

- १५२१: फर्डिनांड मॅगेलन जगप्रदक्षिणा करीत फिलिपाईन्सला पोहोचला.
- १५२८: फत्तेपूर सिक्री येथे राणा संग आणि बाबर यांच्यात युद्ध होऊन राणा संग यांचा पराभव झाला.
- १६४९: शहाजीराजांच्या सुटकेसाठी शिवाजी महाराजांनी शहजादा मुराद (शहाजहानचा मुलगा) यास पत्र लिहीले.
- १९१९: भारतात प्राथमिक शिक्षण सक्तीचे करण्याचा ठराव गोपाळकृष्ण गोखले यांनी मांडला.
- १९३६: महाड येथील चवदार तळ्याचे पाणी पिण्याचा दलितांना हक्क असण्याचा निर्णय मुंबई उच्च न्यायालयाने दिला.
- १९४३: प्रभात चा नई कहानी हा चित्रपट रिलीज झाला.
- १९४५: दुसरे महायुद्ध झ रॉयल एअर फोर्सने तुफानी बॉम्बफेक करून जर्मनीच्या वुर्झबर्ग शहराचा २० मिनीटांत विनाश केला.
- १९६६: अमल कुमार सरकार यांनी भारताचे ८ वे सरन्यायाधीश म्हणुन कार्यभार सांभाळला.
- १९७६: इंग्लंडचे पंतप्रधान हेरॉल्ड विल्सन यांनी राजीनामा दिला.
- २०००: भारतीय हॉकीपटू धनराज पिल्ले आणि मध्य अंतराची धावपटू ज्योतिमय सिकदर यांना के. के. बिर्ला पुरस्कार जाहीर केला.
- २००१: नेल्सन मंडेला यांना गांधी शांतता पुरस्कार देण्यात आला.
- १९५५: राष्ट्रीय लसीकरण दिवस

१६ मार्च जन्म

- १६९३: इंदूर राज्याचे संस्थापक मल्हारराव होळकर यांचा जन्म. (मृत्यू: २० मे १७६६)
- १७५०: जर्मन-ब्रिटीश खगोलशास्त्रज्ञ कॅरोलिना हर्षेल यांचा जन्म. (मृत्यू: ९ जानेवारी १८४८)
- १७५१: अमेरिकेचे ४थे राष्ट्राध्यक्ष जेम्स मॅडिसन यांचा जन्म. (मृत्यू: २८ जून १८३६)
- १७८९: जर्मन गणितज्ज्ञ आणि भौतिकशास्त्रज्ञ जॉर्ज ओहम यांचा जन्म. (मृत्यू: ६ जुलै १८५४)
- १९०१: भारताचे ७वे सरन्यायाधीश, पद्मविभूषण प्र. बा. गजेंद्रगडकर यांचा

## भविष्य

**मेष** हितशत्रूंना आवर बसेल. भरणी नक्षत्राच्या व्यक्तींना राजकीय लाभ घडतील. कृत्तिका नक्षत्राच्या व्यक्तींना शनिवार खरेदीत फसण्याचा.

**वृषभ** कृत्तिका नक्षत्राच्या व्यक्तींना सप्ताहारंभ नोकरीत हितशत्रू पीडेचा. १४ व १५ हे दिवस मृग नक्षत्राच्या व्यक्तींना शनिवार प्रवास.

**मिथुन** सप्ताह काहींना विशिष्ट वेदनेतून हैराण करणारा. बाकी सप्ताहाची सुरुवात पुनर्वसु नक्षत्राच्या व्यक्तींना वैयक्तिक उपक्रमांतून छानच.

**कर्क** अतिशय संमिश्र ग्रहमान राहील. पुनर्वसु नक्षत्राच्या व्यक्तींना शुक्राच्या राश्यांतराचा पुष्य नक्षत्राच्या व्यक्तींना ता. १५ हे दिवस मोठे गतिमान राहतील.

**सिंह** यंत्रं, वाहनं आणि कामगार या त्रिघटकांतून उपद्रव निर्माण करणारा सप्ताह. मघा नक्षत्राच्या व्यक्तींनी अपवादात्मक उद्भवू पाहणाऱ्या परिस्थितीचं भान ठेवावं.

**कन्या** बाकी सप्ताह स्वतंत्र व्यावसायिकांना चांगला प्रतिसाद देईल. हस्त नक्षत्राच्या व्यक्तींचे मोठे व्यावसायिक करारमदार होतील. व्यावसायिक भांडवल पुरवठा होईल. पुत्रचिंता जाईल.

**तुला** प्रेम संबंधांमध्ये अधिक जवळीक निर्माण होईल. जर तुम्हाला काही मिळवायचे असेल तर आजचा दिवस उत्तम आहे. राजकारणी लोकांच्या संपकार्मुळे तुम्हाला चांगला फायदा होऊ शकतो.

**वृश्चिक** फक्त आजची संध्याकाळ आणि शनिवारची संध्याकाळ वातालापातून सांभाळवी. प्रेमिकांनी जपून. घरात कोणाचं लग्न ठरवाल. ज्येष्ठा नक्षत्राची व्यक्ती सप्ताहात चैनीवर खर्च करेल.

**धनु** उत्तराषाढा नक्षत्राच्या व्यक्ती मॅन ऑफ दि मॅच होतील. मूळ नक्षत्राच्या व्यक्तींना ता. १५ हे दिवस मोठे गतिमानच राहतील. राजकीय व्यक्तींकडून लाभ. मात्र शनिवारी वेंधळेपणा टाळा.

**मकर** आज पार्टनर सोबत बोलताना सतर्क राहा. आज तुमची तुमच्या व्यक्तीकडे एखाद्या गोष्टीबद्दल राग व्यक्त कराल. लहान व्यावसायिकांना आज एखाद्या त्रासाला सामोरे जावे लागेल.

**कुंभ** शनिभ्रमणाच्या पार्श्वभूमीवर हेच सांगत आहे. बाकी ता. १४ च्या वसंत पंचमीची संध्याकाळ गाठीभेटींतून हृद्य राहील. धनिष्ठा नक्षत्राच्या व्यक्तींना धनलाभ. तरुणांचं नैराश्य जाईल.प्रेमप्रकरणातून गती मिळेल.

**मीन** अर्थातच जीवनात उत्तम सीक्वेन्स लागतील. उत्तराषाढा नक्षत्राच्या व्यक्तींनी सप्ताहात हट्टीपणा टाळावा. धनिष्ठा नक्षत्राच्या व्यक्तींनी सप्ताहात थट्टामस्करी टाळावी. उत्तरा-भाद्रपदा नक्षत्राच्या व्यक्तींनी सप्ताहात चुकीच्या मित्रांची संगत टाळावी.

Printed, published and owned by Rakesh Shankar Gore and printed at Somani Printing Press, unit no.04, ground floor, n.k.industrial estate, off. aarey road, near pravasi ind. estate, gate no.2, goregaon (east) Mumbai-400063, and published at shop no.12, b-2, sai dham shopping center, mangal nagar, 15 no. last bus stop, near g.c.c. club, mira road (east), Dist.Thane-401107, Maharashtra. editor : Rakesh Shankar Gore. RNI.REG. NO. MAHBIL/2023/86118. Office contact no. 97023 86118, Website: www.lokrakshanay.com, Email: dainiklokrakshanay@gmail.com (ठाणे न्याय कक्षेत)

## संपादकीय

# सहकारी संस्थेचा कारभार करताना...

सहकारी संस्थेच्या संचालक मंडळ किंवा कार्यकारी कमिटीने कामकाजाची पद्धत ठरवून त्याबरहुकूम कारभार केला पाहिजे. तसेच संस्थेच्या कार्यालयीन कर्मचाऱ्यांना कामे वाटून देऊन त्याचे वेळोवेळी मूल्यमापन करणे म्हणजेच कामात शिस्त बाळगून त्याला अधिक प्रभावीपणे राबवणे होय. त्याबाबत.या आधीच्या भागात आपण सहकारी संस्थेतील सभासदांचे हक्क, अधिकार आणि कर्तव्ये याबाबत माहिती घेतली. अशा सभासदांसह संस्थेचा कारभार चांगला झाला तरच संस्था आदर्शवत ठरू शकते. अशा सहकारी संस्थांचे संचालक मंडळ, संस्थेचे कार्यालयीन कर्मचारी यांची कार्ये आणि त्यांच्या नेमणुका याबाबतही आदर्श अशी नियमावली तयार करण्यात आली आहे. एकूणच संस्थेच्या कामकाजाची कार्यपद्धती आणि कार्यशैली निश्चित करून त्याची काटेकोरपणे कार्यवाही केली तर संस्थेचा कारभार चांगला, परिणामकारक आणि सभासदांचेही हित जपणारा असा होऊ शकतो. शिवाय, संस्थेच्या पारदर्शक कारभाराने लौकिक वाढतो. त्यासाठी अशा संस्थेच्या संचालक मंडळाने आपला कारभार कसा चालवावा, कार्यपद्धती कशी ठेवावी, याविषयी आपण येथे पाहूया! कार्यकारिणीच्या सर्व सदस्यांनी संस्थेची मालमत्ता, कागदपत्रे, कार्यालयीन कारभार यांची माहिती करून घ्यावी. संस्था कशी चालवावी, याची कार्यशाळा सहकार खात्याच्या अधिकाऱ्यास बोलावून आयोजित करावी. संपूर्ण संस्थेत सर्व कमिटीने एकत्रित फेरफटका मारून दैनंदिन यंत्रणा आणि सुविधा यांची माहिती करून घ्यावी. त्याच्याशी निगडित सर्व कंत्राटदार, विभाग प्रमुख यांची कार्यपद्धती समजून घ्यावी. आधीच्या कमिटीबरोबर नवीन कमिटीने बैठक घेऊन त्यांच्या अर्धवट किंवा अनुत्तरित राहिलेल्या कामांची यादी करून व सर्व कारभाराची शहानिशा करून मगच पदभार हाती घ्यावा. आधीच्या कमिटीकडून ह्यसंस्थेची सर्व कागदपत्रे सुचीसह सुरक्षितपणे ताब्यात देण्यात आली आहेतद्ध, अशा आशयाचे पूर्वाश्रमीच्या चेअरमन, सेक्रेटरी, खजिनदार आणि इतर सर्व सदस्यांच्या सह्यांचे पत्र मिळाल्यावरच नवीन कमिटीने कामकाजास सुरवात करावी. या पत्राची प्रत रजिस्ट्रार कार्यालयात संस्थेच्या शिक्क्यासह पाठवावी. चेअरमन, सेक्रेटरी, खजिनदार ही तीन मंडळीच बहुदा संस्था चालवितात. कमिटीवरील मंडळी स्वेच्छेने हे समाजकार्य करायला पुढे आलेली असतात. इतर कमिटी सभासदांना कमिटीच्या मासिक सभेची नोटीस सर्व मुद्द्यांसह व खर्चाच्या तपशीलासह सभेपूर्वी वेळेवर मिळालीच पाहिजे. कमिटी बैठक संस्थेच्या अधिकृत कार्यालयातच झाली पाहिजे. बैठक संपेपर्यंत खानपानास सुरवात करू नये. संस्थेच्या मासिक सभांना पूर्ण तयारीनिशी व्यवस्थापक आणि इतर सर्व विभागाचे कंत्राटदार किंवा प्रमुख, कायमस्वरूपी नोकरवर्ग यांना सर्वसाधारण सभेत किचकट अनुत्तरित समस्यांसाठी बनविलेल्या ह्यउपसमितीद्धला संस्थेच्या कर्मचाऱ्यांकडून व कार्यकारिणीकडून विनाशर्त सर्व सहकार्य मिळेल, हा पहिला ठराव आणि सबकमिटीचा अहवाल हा विशेष सर्वसाधारण सभा घेऊन त्यामध्येच चर्चिला जाईल व त्याची शहानिशा संस्थेचे सभासद करतील, असा दुसरा ठराव सभासदांनी सर्वसाधारण सभेत मान्य करून घ्यावा. संस्थेत कर्मचारी व सभासद खासगी नोकरवर्ग नियुक्त्या करताना पोलिस व्हेरीफिकेशन रिपोर्ट, निदान दोन शिफारसपत्रे तपासावीत. त्याचे समाजकंटक, राजकारणी, मोर्चा, मंडळे यांच्याशी संबंध तपासावेत. संस्थेच्या प्रत्येक कर्मचाऱ्याच्या नियुक्तीचे व कामाचे स्वरूप लिखित ठेवून त्यावर नियुक्तीच्या वेळीच स्वाक्षऱ्या घ्याव्यात आणि कामाच्या रोजनिशीची रजिस्टर नोंद ठेवून वेळापत्रकानुसार पाठपुरावा करावा. संस्थेस कर्मचारी नियुक्ती व सेवा तहकूब करणे सोपे होते. संस्थेतील कर्मचारी वर्ग व संचालक मंडळ यांची एकत्र कार्यशाळा घ्यावी. दर महिन्याला मासिक सभेत सर्व कर्मचाऱ्यांना बोलावून कामाची उजळणी करावी. संस्थेची महत्त्वाची कागदपत्रे गहाळ होतात. त्यामुळे अशी कागदपत्रे सह्यांसाठी घरी नेऊ नयेत. सभासद समस्या, कार्यालयीन समस्या यांची चर्चा संस्थेच्या कार्यालयाबाहेर खासगीत करू नये. संस्थेच्या कार्यालयात सीसीटीव्ही कॅमेरा लावावा व संस्थेची सर्व कामे संस्थेच्या कार्यालयातच करावीत. अतिमहत्त्वाची कागदपत्रे सूची करून बँकेच्या लॉकरमध्ये ठेवावीत. सर्व नोंदी डिजिटल युगात कॉम्प्युटरवर करून त्याची एक प्रत वेगळ्या हार्ड डिस्कवर ठेवावी. दर तीन महिन्यांनी बदलता तपशील अद्ययावत करावा. त्याची जबाबदारी कमिटीतील सेक्रेटरी व इतर दोन सदस्यांवर टाकावी. संस्थेतील कुठलाही कर्मचारी/कमिटी सदस्य सोडून गेला तर लगेच सर्व पासवर्ड बदलावेत. संस्थेच्या सभासदांचे इ-मेल घेऊन ह्यगो ग्रीनद्ध संकल्पनेला पुरस्कृत करावे. स्टाफ नियुक्ती करताना व ज्या कमिटी सदस्यास डिजिटल माध्यम वापरता येते त्यांनाच सेक्रेटरी/चेअरमन/खजिनदार अशा पदांवर नेमावे. संस्थेतील सार्वजनिक सुविधा व वापर : सुविधा वापरासाठी संस्थांमधील प्रत्येक सभासद कुटुंबातील प्रत्येक व्यक्तीस किंवा भाडेकरू यांच्यापैकी कुणा एक कुटुंबासच ओळखपत्र द्यावे आणि ते दाखविल्याशिवाय या सुविधा वापरायला प्रवेश देऊ नये. सुविधा केंद्राच्या बाहेर नोटीस बोर्डवर कायमस्वरूपी नियमावली प्रसिद्ध करावी. संस्थेतील प्रार्थना मंदिरे, खासगी पाट्र्या, सार्वजनिक उत्सव : संस्थेत फिरता सुरक्षारक्षक ठेवून रात्री-बेरात्री संस्थेतील अंतर्गत कार्यक्रमामुळे होणाऱ्या ध्वनिप्रदूषणाची माहिती संस्थेच्या रजिस्टरमध्ये नोंदवणे बंधनकारक करावे. यावर जरूर ती दंडात्मक कारवाई संस्थेकडून करावी. कार्यकारिणीच्या निदर्शनास आणूनही कुठलीच कारवाई झाली नाही तर पीडित सभासद व्यक्तिगत पातळीवर पोलिस ठाण्यात तक्रार करू शकतो.

# अण्वस्त्र क्षेपणास्त्राची सुसज्जता



भारताने एमआयआरव्ही तंत्रज्ञानाद्वारे घेतलेले क्षेपणास्त्र चाचणी प्रगतीचे पाऊल मोठे आहे. आपला आण्विक कार्यक्रम शांततेसाठी असला तरी आव्हानांना तोंड देण्यासाठी शस्त्रसज्जता पाहिजेच. त्याबरोबरच चिनी हायपरसोनिकसह येणारी आव्हाने लक्षात घेऊन आणखी नवनवे तंत्रज्ञान विकसित केले पाहिजे.

संरक्षण संशोधन आणि विकास संस्थेने (डीआरडीओ) विकसित केलेल्या स्वदेशी बनावटीच्या अग्नी -५ या क्षेपणास्त्रामध्ये पहिल्यांदाच मल्टिपल इंडिपेंडन्टली टार्गेटेबल री-एंट्री व्हेईकल (एमआयआरव्ही) या तंत्रज्ञानाचा वापर करत घेण्यात आलेली चाचणी यशस्वी झाल्याची माहिती पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी ११ मार्च रोजी दिली. ह्यडीआरडीओद्धला मिळालेल्या या यशामुळे भारताच्या अण्वस्त्रसज्जतेला आणि अण्वस्त्र प्रक्षेपक त्रिकूट (न्युक्लिअर त्रायड) यांना अधिक बळ मिळाले आहे.

भारताने सर्वप्रथम १९७४ मध्ये पोखरणमध्ये अणुचाचणी घेत आण्विक क्षमता सिद्ध केली. कमालीची गोपनीयता बाळगून घेण्यात आलेल्या या चाचणीला स्मायलिंग बुद्ध असे नाव देण्यात आले होते. त्यानंतर १९९८मध्ये भारताने पाच आण्विक चाचण्या (पोखरण-२) घेतल्या. मात्र अण्वस्त्रसज्ज देश म्हणून आंतरराष्ट्रीय स्तरावर स्वतःची विश्वासार्हता वाढविण्यासाठी भारताला अण्वस्त्रनिर्मिती आणि अण्वस्त्रांच्या वापरासाठी विविध अत्याधुनिक प्रणालींची निर्मिती करण्यात प्रावीण्य प्राप्त करणे आवश्यक आहे. त्यामुळेच एमआयआरव्ही तंत्रज्ञानाचा वापर करत घेण्यात आलेली चाचणी महत्त्वाची. त्यामुळे देशाची अण्वस्त्रप्रतिरोधक (डिटरंट) क्षमताही सिद्ध झाली आहे.

आण्विक तंत्रज्ञानाच्या माध्यमातून अण्वस्त्रनिर्मितीची प्रक्रिया गुंतागुंतीची असते. या प्रक्रियेत कोणत्या शस्त्रास्त्रांची निर्मिती करायची आहे, त्यासाठी लागणाऱ्या उपकरणांची संरचना म्हणजे डिझाईन कसे असायला हवे, त्यासाठी कोणते साहित्य लागणार आहे, याबाबतच्या चाचपणीसह अनेक टप्पे असतात. अण्वस्त्रनिर्मिती करत असताना लक्ष्याचा अचूक वेध घेणारी शस्त्रास्त्रयंत्रणा तयार करणे आवश्यक असते. अण्वस्त्रप्रक्षेपक त्रिकूट

अलीकडील काळातील शस्त्रास्त्रे आकाराने लहान असल्यामुळे त्यांच्या प्रक्षेपणासाठी अथवा वापरासाठी विविध प्रणालींचे पर्याय उपलब्ध होत आहेत. मात्र मुळात अशा प्रकारची शस्त्रास्त्रे ही जमिनीवरून, हवेतून अथवा पाणबुड्यांच्या माध्यमातून प्रक्षेपित करता येतात. यालाच ह्यन्यूक्लियर ट्रायड किंवा अण्वस्त्र प्रक्षेपक त्रिकूट असे म्हणतात. या तीनही प्रकारांतून अण्वस्त्र प्रक्षेपणाची सज्जता सिद्ध करण्यासाठी प्रमुख तीन गोष्टींची आवश्यकता आहे - स्ट्रॅटेजिक बॉम्बर, लांब पल्ल्याची आंतरखंडीय बॅलेस्टिक क्षेपणास्त्रे आणि पाणबुड्यांच्या सहाय्याने प्रक्षेपित करता येणारी बॅलेस्टिक क्षेपणास्त्रे. एमआरआयव्ही तंत्रज्ञान हे जमिनीवरून मारा करता येणाऱ्या क्षेपणास्त्र प्रणालीशी निगडित असणारे तंत्रज्ञान आहे. त्याच्या माध्यमातून एकाच क्षेपणास्त्राच्या माध्यमातून एकाचवेळी विविध लक्ष्यांवर शस्त्रांचा मारा करणे शक्य होते. तसे पाहायला गेल्यास हे तंत्रज्ञान सुमारे सहा दशकांपूर्वीचे आहे. या तंत्रज्ञानाचा सर्वात पहिल्यांदा वापर अमेरिकेने मिनीटमन-३ क्षेपणास्त्रात केला होता. यातून पुढे बॅलेस्टिक क्षेपणास्त्रप्रणालीमध्ये क्रांती घडली आणि सैन्यदलांचे शस्त्रास्त्रसामर्थ्य व युद्धसज्जता वाढली.

उपलब्ध माहितीनुसार, अमेरिका, ब्रिटन, चीन आणि रशिया हे देश क्षेपणास्त्रामध्ये एमआयआरव्ही हे तंत्रज्ञान वापरत आहेत. पाकिस्ताननेही २०१७ मध्ये हे तंत्रज्ञान वापरण्याचा प्रयत्न केला होता. डीआरडीओ ने १९ एप्रिल २०१२ रोजी पहिल्यांदा अग्नी-५ या आंतरखंडीय बॅलेस्टिक क्षेपणास्त्राची यशस्वी चाचणी घेतली होती.

सुमारे पाच हजार किलोमीटरचा पल्ला गाठण्याची या क्षेपणास्त्राची क्षमता आहे. तसेच हे क्षेपणास्त्र अण्वस्त्र वाहून नेण्यास सक्षम असून, त्यामुळे चीन आणि पाकिस्तान या दोन्ही देशातील कोणत्याही लक्ष्यावर मारा करण्यास ते सक्षम आहे. नुकतीच एमआयआरव्ही तंत्रज्ञानाचा वापर करत घेण्यात आलेली अग्नी-५ ची चाचणी ही त्याचाच पुढचा टप्पा आहे.

दिव्यास्त्र या प्रकल्पांतर्गत ही चाचणी घेण्यात आली. एमआयआरव्ही हे तंत्रज्ञान केवळ एकच अण्वस्त्र वाहून नेण्याची क्षमता असणाऱ्या पारंपरिक क्षेपणास्त्रांऐवजी एकाच वेळी अनेक लक्ष्यांचा भेद घेण्यास सक्षम असल्याने शत्रूचा अधिक विनाश करू शकणारे आहे. अग्नी-५ मधील एमआयआरव्ही तंत्रज्ञानात भारतीय बनावटीची एव्हीओनिक्स प्रणाली आणि सर्वाधिक अचूकता असणारे सेन्सर बसविण्यात आलेले आहेत. एमआयआरव्ही तंत्रज्ञानाचा वापर करण्यात आलेल्या क्षेपणास्त्राच्या वापरातील सर्वात मोठे आव्हान म्हणजे, विविध शस्त्रास्त्र असणाऱ्या सामग्रीचे (पेलोड) पृथ्वीच्या कक्षेत परतणे आणि सर्वाधिक अचूकता दाखवत विविध लक्ष्यांवर शस्त्रांचा अचूक मारा करणे.

कोणावरही आपणहून पहिला हल्ला न करणे हे भारताचे अण्वस्त्रधोरण आहे. त्यामुळे भारत कधीच अणुयुद्ध सुरू करणार नाही. परंतु कोणताही अण्वस्त्र हल्ला परतवून लावण्याची क्षमता सिद्ध करण्यासाठी ही चाचणी घेणे आवश्यक होते आणि त्यादृष्टीने विविध प्रकारचे अत्याधुनिक तंत्रज्ञान विकसित करणेही तितकेच आवश्यक आहे. या पार्श्वभूमीवर एमआयआरव्ही तंत्रज्ञानाने सुसज्ज असणाऱ्या अग्नी-५ या क्षेपणास्त्राची चाचणी घेण्यात आली. भारताचे हवाई दल हे कोणताही अण्वस्त्र हल्ला परतवून लावण्यासाठी आणि चोख प्रत्युत्तर देण्यासाठी आज सुसज्ज आहे. भारताकडे असणारी आंतरखंडीय क्षेपणास्त्रे ही भारताची अण्वस्त्रसज्जता दर्शवत आहेत.

त्याचप्रमाणे २०१८ पासून सातत्याने तंत्रज्ञान विकसित करून भारताने पाणबुडीच्या सहाय्याने बॅलेस्टिक क्षेपणास्त्र प्रक्षेपणाची क्षमताही सिद्ध केली आहे. आयएनएस अरिहंतह्यने आपली अण्वस्त्रविरोधी क्षमता सिद्ध केलेली आहे. बॅलेस्टिक क्षेपणास्त्र प्रतिरोधकयंत्रणा एस-४००च्या माध्यमातून कोणत्याही अण्वस्त्र हल्ल्याला परतवून लावण्याचे सामर्थ्य भारताने प्राप्त केले आहे.

असे असले तरीदेखील चीनकडून विकसित केल्या जात असलेल्या हायपरसॉनिक शस्त्रास्त्रांबाबत भारताने सावध राहणे आवश्यक आहे. कारण या शस्त्रास्त्रांपुढे भारताकडे सध्या असणारी पारंपरिक बॅलेस्टिक क्षेपणास्त्र यंत्रणा प्रभावहीन ठरण्याची भीती आहे. उपलब्ध झालेल्या काही अहवालांच्या आधारे हायपरसॉनिक शस्त्रास्त्रांच्या निर्मितीमध्ये चीन आण्विक तंत्रज्ञानाचा वापर करत असल्याची भीती व्यक्त केली आहे. आपल्याकडे असणारी अण्वस्त्रांची संख्या आणि त्याच्या उत्पादनाबाबत कोणताही देश तंतोतंत खरी माहिती उघड करत नाही. त्यामुळे भारताने घेतलेल्या एमआयआरव्ही तंत्रज्ञानाच्या यशस्वी चाचणीनंतर एक निष्कर्ष नक्कीच काढता येईल की, भारत अण्वस्त्रनिर्मितीत अत्याधुनिक आणि सूक्ष्म तंत्रज्ञानाच्या वापरावर भर देत आहे. भारतही व्यूहरचनात्मक आण्विक शस्त्रांची (टॅक्टिकल न्यूक्लियर वेपन) निर्मिती करण्यास इच्छुक आहे का?

याबाबत मात्र कोणताही निष्कर्ष आताच काढता येणार नाही. तथापि भारताने पाकिस्तानच्या व्यूहरचनात्मक आण्विक शस्त्रांच्या निर्मितीवर लक्ष ठेवणे अत्यंत आवश्यक आहे. विशेषतः चीनकडून त्यांना देण्यात येत असलेले एमआयआरव्ही तंत्रज्ञान पाकिस्तानला विशेष फायद्याचे ठरत असून त्यांची अण्वस्त्र प्रतिरोधी क्षमता वाढविण्यास सहाय्यभूत ठरत आहे. त्यामुळेच भारताने स्वतःचे एमआयआरव्ही तंत्रज्ञान तातडीने विकसित करणे आणि क्षेपणास्त्रामध्ये त्याचा अंतर्भाव करणे अत्यंत आवश्यक आहे.

# शहापूर तालुक्यातील वाशाळा फुगाळे रस्त्याची दैनावस्था

**कसारा** : शहापूर तालुक्यातील वाशाळा फुगाळे रस्त्याची पूर्णतः दैनावस्था झाली आहे.रस्त्यावर तयार झालेले खाचखळगे आणि उखडलेल्या रस्ता दुरुस्तीकडे दुर्लक्ष होत आहे.

तालुक्यातील कसारा येथून ९ किमी असलेल्या वाशाळा फुगाळे रस्त्याची मोठी दुरवस्था झाली आहे. रस्त्याच्या दुरुस्तीकडे प्रशासनाचे साफ दुर्लक्ष झाल्यामुळे नागरिकांत तीव्र नाराजी पसरली आहे.समृद्धी महामार्गाच्या कामात नेमण्यात आलेल्या अँपकॉन कंपनीने आपली अवजड वाहने व इतर यांत्रिक वाहने चालविताना पुढे होणाऱ्या रस्त्याच्या देखभाल दुरुस्तीची जबाबदारी घेतली होती.त्यासाठी ठाणे जिल्हा परिषदेकडे सुरक्षा अनामत रक्कम ठेवली होती. परंतु गत २ वर्षांपासून खाचखळगे आणि उखडलेल्या रस्त्याच्या दुरवस्थेबाबत कोणीही लक्ष दिलेले नाही. प्रशासन रस्त्याच्या दुरुस्तीकडे लक्ष देईल या प्रतिक्षेत ग्रामस्थांच्या नजरा लागल्या आहेत. वाशाळा फुगाळे रस्ता दुरुस्तीबाबत आदिवासी संघटना,स्थानिक लोकप्रतिनिधी आणि ग्रामस्थांनी अनेकदा आवाज उठवला.परंतु प्रशासन आणि संबंधित ठेका कंपनी यांच्यात ताळतंत्र नसल्याने रस्त्याच्या दुरुस्तीकडे लक्ष दिले गेले नाही.ग्रामस्थांच्या पदरी निराशेशिवाय आणि रस्त्याच्या खाचखळग्यांशिवाय दुसरे काहीही शिल्लक राहिलेले नाही.समृद्धी महामार्गाचे काम करत असताना अँपकॉन इन्फ्रा कंपनीने वाशाळा फुगाळे रस्त्याच्या वापराचा आणि देखभाल दुरुस्तीचा करारनामा जिल्हा परिषदेशी केला होता.त्यासाठी सुरक्षा अनामत रक्कम ठेवण्यात आली होती. वेळीच रस्त्याची दुरुस्ती केली नाही तर भविष्यात अपघात व मोठी वित्तहानी होण्याची शक्यता नाकारता येत नाही.रस्त्याच्या डागडुजी बाबत दुर्लक्ष केले जात असल्याने सपशेल करारनामाचा भंग केला जात आहे. असे उद्देशून जिल्हा परिषद शहापूर पंचायत समिती बांधकाम विभागाने अँपकॉन इन्फ्रा कंपनीला पत्र दिले आहे.



# ठेकेदारविरोधात ग्रामस्थ आक्रमक, रस्त्याचे काम अयोग्य

**वाडा** : तालुक्यातील मांडा-भोपीवली-खरीवली या रस्त्याची काही वर्षांपासून दुरवस्था झाली होती. ग्रामस्थांनी शासन दरबारी हेलपाटे मारून अखेर हा रस्ता यावर्षी मंजूर झाला. रस्त्याच्या कामाला सुरुवात झाली, मात्र ठेकेदाराकडून रस्त्याचे काम नियमाप्रमाणे होत नसून, हे काम निकृष्ट दर्जाचे सुरू केल्याने ग्रामस्थांनी निकृष्ट कामाचा जाब ठेकेदाराला विचारत सोमवारपासून कामबंद केले आहे. जोपर्यंत दर्जेदार काम केले जात नाही, तोपर्यंत काम चालू न करण्याचा निर्धार ग्रामस्थांनी केला आहे. ग्रामीण भागातील रस्ते दर्जेदार व्हावेत म्हणून सरकारने पंतप्रधान ग्राम सडक योजनेच्या धर्तीवर मुख्यमंत्री ग्रामसडक अंतर्गत रस्त्यांसाठी भरीव निधी दिला. वाड्यातील ५.२ किमीच्या रस्त्यासाठी मुख्यमंत्री ग्राम सडक योजनेंतर्गत सुमारे ११ कोटी १२ लाखांचा निधी या रस्त्यासाठी मंजूर केला. मात्र रस्त्याचे काम करताना ठेकेदार कंपनीने गुणवत्ता राखली गेली नसल्याचा स्थानिक नागरिकांचा आरोप आहे. मांडा-भोपीवली-खरीवली रस्त्याच्या ५.२ किमी अंतरात सुमारे चार मोऱ्या व एक सेफ्टी व्हॉल्व्हचा समावेश आहे. या सर्व कामांमध्ये ठेकेदार नियमाप्रमाणे काम करत नसून, कामाचा दर्जा निकृष्ट असल्याने काम बंद पाडले असल्याचे नागरिकांचे म्हणणे आहे.



> या रस्त्यासाठी मोठा निधी मिळाल्याने रस्त्याचे काम चांगल्या दर्जाचे व गुणवत्तापूर्ण व्हायला हवे, मात्र या कामात ठेकेदार कंपनीने निकृष्ट दर्जाचे साहित्य वापरून गुणवत्ता राखलेली नाही. त्यामुळे हे काम आम्ही बंद केले आहे.
>
> - **आझाद अधिकारी**, उपसरपंच, ग्रा.पं. खरीवली

> ग्रामस्थ व ठेकेदाराची संयुक्त बैठक बोलावून ग्रामस्थांच्या तक्रारींचे निवारण करून नंतर काम सुरू करण्यात येईल.
>
> - **विनोद घोलप**, अभियंता, मुख्यमंत्री ग्राम सडक योजना

> मांडा-भोपिवली-खरीवली या रस्त्याचे काम नियमाप्रमाणे सुरू आहे.
>
> - **संदीप ठाकरे**, मयूर

# Mumbai men who fled with 1.125 kg of stolen gold worth Rs. 73 lakh arrested from Rajasthan

**Mumbai** : A man accused of stealing 1.125 kilograms of gold worth Rs 73 lakh from the hallmarking unit where he works has been arrested in Rajasthan, according to a police statement issued on Thursday. The culprit, identified as Kanaram alias Praveen Jat, fled with the gold from the Lalbaug facility. He was later arrested by officials in Rajasthan, according to a Kalachowkie police station official, reported PTI. According to the report, the officer explained that CCTV footage showed the suspect departing the area in a taxi. In order to avoid capture, he trashed his SIM card and often changed his mobile phone number. In addition, he moved every two to four days to escape notice. "CCTV footage showed he took a taxi and fled. He threw away his SIM card and was constantly changing his mobile phone number to avoid getting caught. He was also changing his location every two to four days," the official told PTI. Following extensive technical surveillance, authorities managed to track and apprehend the suspect. He now faces charges under relevant sections of the Indian Penal Code, the official further told PTI.



In another unrelated incident, a revenue official was arrested for allegedly demanding and accepting a bribe in Navi Mumbai. According to a PTI report, the Anti-Corruption Bureau sleuths caught the official red-handed while accepting a bribe from a complainant over land records. Deputy Superintendent of Police of ACB (Navi Mumbai), Shivraj Mhetre told PTI that the accused, identified as Kiran Gore, aged 48, worked as a revenue assistant at the Panvel tehsil office. The DSP further said that Gore had allegedly demanded Rs 1 lakh from the complainant to facilitate the conversion of his two ancestral properties from Category II to Category I under the Bombay Tenancy and Agricultural Lands Act, reported PTI. According to the report, the man had allegedly negotiated and brought down the bribe amount to Rs 80,000 and approached the ACB who laid a trap to arrest the official. The ACB officials intercepted and arrested Gore on Thursday evening while he was accepting Rs 40,000 as part of the bribe. He has been booked under Prevention of Corruption Act at the Panvel police station.

# Sanjay Raut takes a jab at BJP over electoral bonds, says it is 'biggest scam of India'

**Mumbai,** Shiv Sena (UBT) leader Sanjay Raut targeted the BJP on Friday over their involvement in what he called the "biggest scam in the country" regarding electoral bonds. Raut said that gaming and gambling companies are purchasing electoral bonds and directing funds straight into the BJP's bank accounts. Raut also stated that numerous companies bought money in electoral binds and transferred it to the political parties. Raut told, "The gaming and gambling corporation buys electoral bonds which are then deposited into the ruling party's bank account. Megha engineering secures numerous contracts and in return for the favour purchases lakhs of electoral bonds, funnelling the funds to the BJP's bank account. There are many such companies for which the money has been bought in the electoral bonds and transferred to the political parties. This is the biggest scam in the country." Meanwhile, per the ANI report, RJD MP Manoj Jha highlighted a potential link between recent ED raids on companies and their subsequent purchase of bonds. "People are just witnessing it today, everybody knew about it already...ED carries out a raid and just after a few hours, electoral bonds are bought. One must look at this correlation," Manoj Jha was quoted as saying. According to the report. Rajya Sabha MP Kapil Sibal too expressed his concerns and remarked that no investigative agencies would look into the electoral bonds issue. He said that had the Opposition been involved in the issue, ED and CBI would be taking action against them. He also took a jab at PM Modi.



